
मार्गदर्शन

# अशी करा कारले आणि दोडक्याची लागवड

प्रा. पी.एस. घुले
(मो. ९१७२०६५५५५)
प्रा. डी.व्ही. थोरात
प्रा. एस.डी. विधाते
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक






व्यापारी शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठा चढउतार होत असतो. अशा आर्थिक परिस्थितीचा कौटुंबिक बजेटला धक्का लागू नये, म्हणून अभ्यासू शेतकरी शेतीच्या एका भागात वेलवर्गीय भाज्यांची शेती करतात. यात कारले व दोडके ही पिके अग्रणी आहेत कारण शहरी व स्थानिक बाजारात या फळभाज्यांना वर्षभर चांगली मागणी असते.

**का**रली आणि दोडकी अशा दोन्ही पिकांची पावसाळी व उन्हाळी हंगामात लागवड करतात. कारल्यास उष्ण व दमट तर दोडक्यास समशीतोष्ण व दमट हवामान मानवते. दोडका थोडीशी थंडी सहन करु शकतो, मात्र कारल्याच्या वेलीवर थंडीचा वाईट परिणाम होतो.

**जमीन** : भुसभुशीत चांगला निचरा असणारी भारी ते मध्यम जमीन निवडावी. चोपण अथवा चिबड जमिनीत ही पिके घेऊ नयेत.

**पूर्वमशागत व लागवड** : जमिनीची उभी आडवी नांगरट करून, काडी-कचरा वेचून शेत स्वच्छ करावे. प्रतिहेक्टरी १०० ते १५० क्विंटल चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट हुमणासूरमध्ये मिसळून शेतात पसरवावे. हुमणासूर हे उत्तम दर्जाचे मृदा सुधारक असून, मातीतील उपयोगी सूक्ष्मजीवांची संख्या वाढवते. तसेच हुमणी, सूत्रकृमी, वाळवी यांची संख्या कमी करते. कुळवणी करून खत जमिनीत चांगले मिसळावे. कारल्याच्या लागवडीसाठी दोन ओळीत १.५ ते २ मीटर व दोन वेलीत ६० सें.मी. अंतर ठेवावे. दोडक्यासाठी दोन ओळी २.५ ते ३.५ मीटर याप्रमाणे तर दोन वेलीत ८० ते १२० सें.मी. अंतर ठेवावे. प्रत्येक ठिकाणी २ ते ३ बिया लावाव्यात. दोन्ही पिकांत बियांची टोकन ओलसर जमिनीत करावी. बिया वरंब्याच्या बगलेत टोकाव्यात. उगवण होईपर्यंत बेताचे पाणी द्यावे.

**हंगाम** : कारल्याची लागवड उन्हाळी पिकासाठी जानेवारी-फेब्रुवारी- मार्च व खरिपाची लागवड जून-जुलै महिन्यात करावी. दोडका कमी दिवसात येणारा असल्यामुळे त्याची लागवड कारल्यापेक्षा १५ ते २० दिवसांनी उशिरा केली तरी चालते.



**बियाण्यांचे प्रमाण** : कारल्यासाठी हेक्टरी ५ ते ६



किलो बियाणे लागते. बियाणे २५ ते ५० पी.पी.एम. सुपरजिबच्या द्रावणात बुडवून नंतर प्रतिकिलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम कार्बेंडेझिम लावून नंतर लागवड करावी. दोडक्यासाठी हेक्टरी ३ ते ४ किलो ग्रॅम बियाणे लागते.

**खते व पाणी व्यवस्थापन** : कारले पिकासाठी प्रतिहेक्टरी २० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश लागणीच्या वेळी द्यावे. नत्राचा दुसरा हप्ता २० किलो या प्रमाणात फुले दिसायच्या वेळेस द्यावा. तसेच दोडका पिकासाठी प्रतिहेक्टरी २० ते ३० किलो नत्र २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश लागवडीच्या वेळी द्यावेत. नत्राचा २५ ते ३० किलोचा दुसरा हप्ता एक महिन्याने द्यावा. अनेक वेळा अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे पानांवर दिसू लागतात. गैरसमज होऊन आपण बुरशीनाशक, जीवाणुनाशकांची फवारणी करतो पण फायदा होत नाही. त्यामुळे या कामी तज्ञांचा सल्ला घेणे फायदेशीर आहे.

दोन्ही पिके फवारणीच्या खतांना चांगला प्रतिसाद देतात. या दृष्टिकोनातून अमृत गोल्ड एन.पी.के. खतांची माहिती देत आहे.

**अमृत गोल्ड एन.पी.के.** : ही सर्व खते पाण्यात विद्राव्य असल्याने फवारणी व ठिबकने पिकाच्या गरजेच्या वेळी देता येतात. त्यामुळे थोडी सुद्धा वाया जात

नाहीत व अतिशय कमी प्रमाणात वापरून देखील जास्त प्रभावशाली ठरतात. ही खते नत्र, स्फुरद, पालाश,



मॅग्नेशियम व गंधकाचा ठराविक प्रमाणात पुरवठा करतात. यात क्लोराईड, सोडियम व इतर हानिकारक पदार्थ अजिबात नसतात. इतर खते, कीटकनाशके व तणनाशकांसोबत देखील वापरता येतात. ही खते पर्यावरणपूरक असून मजुरीच्या खर्चात बचत करतात. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार फवारणी खताची निवड करता येते.

अमृत गोल्ड १९–१९–१९ नत्र, स्फुरद व पालाशचा समप्रमाणात पुरवठा करते. वाढीच्या अगदी सुरवातीच्या काळात याचा वापर करावा. निस्तेज झालेल्या पिकात सुधारणा करण्यासाठी याची फवारणी अतिशय प्रभावी ठरते.

अमृत गोल्ड १३–४०–१३ चा शाखीय विकासासाठी चांगला उपयोग होतो.

अमृत गोल्ड १२–६१–०० म्हणजेच विद्राव्य मोनो अमोनियम फॉस्फेट; नत्र व स्फुरदचे उत्कृष्ट खत. सुरवातीच्या काळात जेव्हा नत्र व फॉस्फेटची पिकास गरज असते तेव्हा याचा वापर प्रभावशाली ठरतो. पीक फुलावर यायला यामुळे मदत मिळते.

अमृत गोल्ड १३–००– ४५ म्हणजेच विद्राव्य पोटॅशिअम नायट्रेट. या खतात नत्र नायट्रेट स्वरुपातील असल्याने लगेच शोषले जाते, शिवाय पोटॅशिअमच्या शोषणात मदत करते. यात क्लोराईड नसल्याने म्युरेट ऑफ पोटॅशपेक्षा चांगले आहे, क्षारपड जमिनीत याचा उपयोग लाभकारी आहे.

अमृत गोल्ड ००–५२–३४ म्हणजेच विद्राव्य मोनो पोटॅशिअम फॉस्फेट; स्फुरद व पोटॅशचे उत्कृष्ट खत. फळांच्या वाढीच्या सुरवातीच्या काळात जेव्हा पोटॅशिअम व फॉस्फेटची पिकास जास्त भूक असते तेव्हा याचा वापर प्रभावशाली ठरतो. फळे रसदार व गोड व्हावीत म्हणून फळांच्या वाढीच्या काळात याचा उपयोग करावा.

अमृत गोल्ड ००–००–२३ म्हणजेच पोटॅशिअम शोनाईट, पालाश व मॅग्नेशियमची पूर्तता करते. दोन्ही अन्नद्रव्ये सल्फेट स्वरुपात असतात त्यामुळे गंधकाचा पुरवठा होतो. क्लोरिन सहन न होणाऱ्या पिकात एम.ओ.पी. ऐवजी याचा वापर केला जातो.

अमृत गोल्ड ००–००–५० म्हणजेच सल्फेट ऑफ पोटॅश. पिकास पोटॅश व गंधकाचा पुरवठा करणारे विद्राव्य खत. यात क्लोराईड नसल्याने म्युरेट ऑफ पोटॅशपेक्षा चांगले आहे, क्षारपड जमिनीत याचा उपयोग लाभकारी आहे.

फळांची टिकवण क्षमता वाढण्यासाठी याची फवारणी करावी. प्रत्येक पिकास वाढीच्या काळात केव्हा ना केव्हा, कोणत्या ना कोणत्या सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता जाणवते. एका सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता झाली की अन्य सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता निर्माण होते. याला को–डेफिसिअन्सी म्हटले जाते. त्यामुळे वैज्ञानिकांनी सूक्ष्म अन्नद्रव्यांचे मिश्रण वापरण्याची सूचना केली आहे.



कमीत कमी मात्रेत याचा अधिक चांगला फायदा दिसून येतो. याच्या फवारणीमुळे मातीतील इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांचे देखील शोषण होते. याच्या फवारणीने

पिकाची वाढ जोमात तर होतेच शिवाय रोग प्रतिकारक्षमता देखील विकसित होते. यासाठी आपण पाटील बायोटेकचे मायक्रोडील ग्रेड २ हे एक सहा सूक्ष्म अन्नद्रव्यांचे मिश्रण वापरावे. यात जस्त ३%, लोह २.५%, मंगल १%, तांबे १%, बोरोन ०.५% व मोलाब्द ०.१% आहे. महाराष्ट्राच्या कृषी विभागाने या ग्रेडच्या फवारणीची शिफारस केली आहे. याचा डोस फक्त १ मि.लि. प्रतिलिटर लागतो. विकसित होण्याच्या काळात दोनदा पुनरावृत्ती करावी.

**आंतरमशागत** : झाडाभोवतालचे तण काढून स्वच्छता ठेवावी, जमीन नेहमी भुसभुशीत ठेवावी. दोन्ही पिकास आधाराची गरज असल्यामुळे बांबू, झाडांच्या वाळलेल्या फांद्या व तारेचा वापर करावा. वेली नीट पसरल्याने उत्पादन वाढीस मदत होते.

**रोग व कीड** : या पिकांवर प्रामुख्याने केवडा (डाऊनी मिल्ड्यू) व भुरी (पावडरी मिल्ड्यू) या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो.



भुरीमध्ये पानांच्या दोन्ही भागांवर व खोडावर पावडरीसारखे लहान ठिपके सुरवातीला दिसतात. हे ठिपके वाढत जाऊन संपूर्ण पानांवर खूप जलद पसरतात. या भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डिनोकॅप-१ मि.लि. + डॉक्टर प्लस ४ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यातून फवारावे.

दमट हवामानात होणारा केवडा हा बुरशीजन्य रोग खूपच हानिकारक आहे. पानांच्या वरच्या बाजूने पिवळ्या रंगाचे लहान ठिपके सुरवातीला दिसतात. पानांच्या खालच्या बाजूने पाहिल्यावर चिकट, ओले, फिकट हिरव्या रंगाचे ठिपके दिसतात. हे ठिपके ठराविक आकारापेक्षा जास्त वाढत नाहीत. परंतु मोठ्या संख्येने असल्यामुळे पूर्ण पानभर पसरतात. यामुळे पाने वाळतात व संपूर्ण पीक जळाल्यासारखे दिसते. या रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २ ग्रॅम प्रतिलिटर + व्हेनॉम १ मि.लि. प्रतिलिटर पाण्यातून फवारावे.

**किडी** : या पिकांवर प्रामुख्याने तांबडे भुंगे, फळमाशी, मावा, नागअळी या किडींचा प्रादुर्भाव होतो. बचावात्मक कीडनियंत्रण पद्धतीचा उपयोग नक्की करावा. क्षेत्रात एकरी दहा (पिवळे ७ व निळे ३) चिकट सापळे लावले तर कीडनिरीक्षण व नियंत्रण दोन्ही शक्य होते. जर परिसरातील सर्व शेतकरी बांधवांनी मिळून हे नियोजन केले तर अधिक प्रभावी होऊ शकते.

पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी ट्रायअॅझोफॉस २ मि.लि. प्रतिलिटर पाण्यातून फवारावे. फळमाशीच्या नियंत्रणासाठी मक्षिकारी काम-गंध सापळे एकरी ६ लावावे. नागअळीच्या नियंत्रणासाठी ट्रायझोफॉस २ मि.लि. व पोकलॅड १ मि.लि. प्रतिलिटर फवारावे.

**काढणी व उत्पादन** : पीक लागवडीनंतर ६० ते ६५ दिवसांनी फुलावर येते. पूर्ण वाढलेली पण कोवळी फळे काढावीत. नखाने हळूच दाबल्यावर व्रण पडतो, ती फळे कोवळी समजावीत. दोडक्याचे हेक्टरी १०० ते १५० क्विंटल उत्पादन मिळते.

कारल्याची फळे कोवळी असतानाच काढावीत. कारल्याचे हेक्टरी १०० ते १५० क्विंटल उत्पादन येते.

**नाविन्यपूर्ण बाजारपेठ** : तुमच्या शेतीतून उत्पादित होणारे कारले लगेच विकले गेले तर पैसा लवकर मोकळा होतो. पण अशा ठिकाणी तुम्ही नाडले जाण्याची शक्यता असते. ही गोष्ट लक्षात घेऊन एकूण उत्पादित कारल्याचा काही भाग वेगवेगळ्या पद्धतीने विकल्यास अधिक फायदा होईल. शहरी भागात प्रभात फेरी मारणाऱ्यांची संख्या फार मोठी असते. ही मंडळी रस्त्याच्या बाजूला विकला जाणारा कारल्याचा ज्यूस पितात. ज्यूस बनवून विकणाऱ्या लोकांशी संपर्क साधला तर ताज्या कारल्यासाठी व्यावसायिक ग्राहक मिळू शकतो. ही मंडळी कारल्याचे काप सुकवून विकू शकतात. शहरी भागात या उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ आहे. ■